महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मधील कलम १६(क) नुसार विविध प्रवर्गाकरिता पाण्याचे क्षेत्रिय वाटप निर्धारित करणे व प्रकरण परत्वे बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी मा.मंत्रीमंडळ उप समिती गठीत करणे

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१५/(४४/१५)/सिं.व्य.(धोरण)

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक - १७ नोव्हेंबर, २०१६

प्रस्तावना -

सन २०११ मध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मध्ये कलम १६(क) नव्याने अंतर्भूत करण्यात आला आहे. कलम १६(क) (१) मध्ये विविध प्रवर्गाकरिता पाण्याचे क्षेत्रिय वाटप (sectoral allocation) राज्य मंत्रीमंडळ स्तरावरुन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसारची कार्यवाही अद्याप झालेली नसल्याने सध्या बिगर सिंचनाचे पाणी आरक्षण प्रस्ताव मा. मंत्री मंडळासमोर निर्णयार्थ सादर केले जात असल्याने त्यांच्या मंजूरीस विलंब होतो. सदरचा विलंब कमी करण्यासाठी सिंचन प्रकल्पातील पाण्याचे विविध प्रवर्गाकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमातील कलम १६ (क) नुसार क्षेत्रिय वाटप (Sectoral Allocation) निर्धारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. दि.०८.११.२०१६ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत त्यावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय -

१.० महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ कलम १६ (क) (१) नुसार पूर्ण झालेल्या, प्रगतीपथावरील व नियोजित सिंचन प्रकल्पातून विविध प्रवर्गाकरिता खालीलप्रमाणे क्षेत्रिय वाटप (sectoral allocation) निर्धारित करण्यात येत आहे -

| | | |
|---|---|---|
| (अ) | पिण्यासाठी | १५ टक्के |
| (ब) | औद्योगिक | १० टक्के |
| (क) | सिंचन | ७५ टक्के |

मात्र या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत दिलेली बिगर सिंचन आरक्षणे अबाधीत राहतील.सदर क्षेत्रिय वाटपाची मर्यादा प्रमाणशीर (Proportionate) बाष्पीभवन व्ययासह राहील. तसेच तुटीच्या

वर्षातील तुट सर्व प्रवर्गामध्ये पाणी वापराचे प्रमाणात विभागली जाईल. असे करताना पिण्याच्या पाण्यासाठी व औद्योगीक पाणी वापरासाठी महत्तम कपात अनुक्रमे २५ टक्के व ५० टक्के राहील.

१.१ वरील क्षेत्रिय वाटपाचे ३ वर्षापेक्षा कमी होणार नाही अशा कालांतराने पुनर्विलोकन करण्यात येईल.

**२.० प्रकरण निहाय बिगरसिंचन पाणी आरक्षणास मान्यता देणे :-**

२.१ परिच्छेद १ मध्ये निर्धारित केलेल्या क्षेत्रिय वाटपाच्या मर्यादेमध्ये पिण्याच्या पाण्याच्या व औद्योगिक पाणी वापराच्या आरक्षण प्रस्तावास महामंडळ स्तरावरुन मान्यता द्यावी.

२.२ परिच्छेद १ मध्ये निर्धारित केलेल्या क्षेत्रिय वाटपापेक्षा जादा होणारे वैयक्तिक, ग्रामपंचायती, नगर पालिका, नगरपंचायती, जिल्हापरिषदा, कटकमंडळे, सहकारी गृहनिर्माण संस्था व शिक्षण संस्थांच्या पिण्याच्या पाण्याचे आणि सुक्ष्म व लघु उद्योगांचे औद्योगीक पाणी वापराचे प्रस्तावांना शासनस्तरावरून मा. मंत्री, (जलसंपदा) यांच्या मंजूरीने मान्यता द्यावी.

२.३ परिच्छेद १ मध्ये निर्धारीत केलेल्या क्षेत्रीय वाटपापेक्षा जादा होणारे व परिच्छेद २.२ मधील नमुद प्रस्ताव वगळून पिण्याच्या व औद्योगिक पाणी वापराच्या आरक्षण प्रस्तावांना मा. मंत्रीमंडळ उपसमितीच्या स्तरावरुन मान्यता द्यावी. सदर मा. मंत्रीमंडळ उपसमिती गुणवत्तेवर आधारीत निर्णय घेईल. निर्णय घेताना अशा आरक्षणामुळे सिंचनावर होणाऱ्या परिणामाचाही विचार करण्यात येईल.

३.० **मा.मंत्रीमंडळ उपसमिती –**

परिच्छेद क्र. २.३ मधील बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी खालीलप्रमाणे मा. मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात येत आहे –

| | |
|---|---|
| १. मा. मंत्री, जलसंपदा | अध्यक्ष |
| २. मा. मंत्री, उद्योग | सदस्य |
| ३. मा. मंत्री, कृषि | सदस्य |
| ४. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता | सदस्य |
| ५. मा. मंत्री, जलसंधारण | सदस्य |
| ६. मा. राज्यमंत्री, नगरविकास | सदस्य |
| ७. सचिव (ज.सं.व्य व ला.क्षे.वि) | सदस्य सचिव |

४.० मा. मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकांना अप्पर मुख्य सचिव (वित्त विभाग) व संबंधित विभागाचे अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव हे निमंत्रीत राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१६१११७१६२५२२६६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

S M Upase

Digitally signed by S M Upase
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Secretary (CAD), postalCode=400032, st=Maharashtra, cn=S M Upase
Date: 2016.11.17 16:27:51 +05'30'

(शि.मा.उपासे)
सचिव (जसंव्य व लाक्षेवि)

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३) मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४) मा. सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५) मा. विराधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
६) मा. विराधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
७) मा. मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव.
८) मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव.
९) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव.
१०) मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव.
११) मा. मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
१२) मा. राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव.
१३) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
१४) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
१५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१६) महालेखापाल (लेखापरिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१८) महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१९) सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
२०) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२१) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२) विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३) सर्व मंत्रालयीन विभाग.
२४) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५) सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

२६) सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७) सर्व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२८) सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९) सर्व अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०) सर्व कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३१) सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
३२) सर्व महासंचालक, जलसंपदा विभाग.
३३) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
३४) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
३५) निवडनस्ती कार्यासन सिं.व्य. (धोरण).